महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर–440 001
*Email : msboardnagpur@gmail.com*

पत्र क्र.नाविमं/लेखा–रोख/1777
नागपूर दिनांकः 13/06/2025

## परीपत्रक

विषय :– शैक्षणिक वर्ष 2025–26 साठीचे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणेबाबत.
संदर्भ :– राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.मं./लेखा प्रकाशन 1937 दि. 02/06/2025

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये शैक्षणिक वर्ष 2025–26 पासुन राज्यातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाकडून नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क राज्य मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेत स्थळावर ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याची सुविधा नव्याने संगणक प्रणाली विकसीत करण्यात येत आहे.

तरी सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांना कळविण्यात येते की, नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क राज्य मंडळाकडून वरील नमुद संकेतस्थळावरून (वेबसाईट) भरणा केल्याशिवाय फेब्रुवारी/मार्च 2026 मध्ये घेण्यात येणाऱ्या इ.10 वी व इ. 12 वी परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने मंडळास सादर करता येणार नाहीत.

यास्तव या विभागीय मंडळाकडून ज्या शाळांनी बॅक ऑफ इंडीया या बॅकेचे चलान घेवून गेले असेल आणि चलान फॉर्म शिल्लक राहिले असेल त्या चलानवरून शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांनी नोंदणी शुल्क, शिक्षण संक्रमण शुल्क वा इतर रक्कमा भरणा करण्यात येवू नये.

तसेच लेखा शाखा व रोखपाल यांनी राज्यमंडळाकडून पुढील आदेश होईपर्यंत तुर्त कोणत्याही माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाकडून रोखीने अथवा चलानद्वारे सन 2025–26 साठीचे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क स्विकारू नये.

Ratolkar
(रवींद्र काटोलकर)
विभागीय सचिव (प्रभारी),
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रति,
1. प्राचार्य/मुख्याध्यापक
   सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालय
2. लेखा शाखा/रोखपाल
   नागपूर विभाग, नागपूर

प्रत :– मा. सचिव, राज्य मंडळ पुणे यांना माहितीस्तव.

Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Nea
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
स.नं.८३२—ए, फायनल प्लॉट नं.
१७८,१७९, बालचित्रवाणीजवळ,
आघारकर रिसर्च इन्स्टिटयुटच्या मागे,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे—४११ ००४

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 Fax : 25665807 &
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./लेखा—प्रकाशन/२२२८
पुणे ४११ ००४.
दिनांक— १९/०६/२०२५

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषय— शैक्षणिक वर्ष २०२५—२६ साठीचे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणेबाबत.

संदर्भ — क्र.रा.मं./लेखा—प्रकाशन/१९३७/दि.०२/०६/२०२५ चे पत्र.

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून कळविण्यात येते की, राज्यातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून शैक्षणिक वर्ष २०२५—२६ चे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क www.mahahsscboard.in या राज्य मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने सोमवार दि.२३/०६/२०२५ पासून स्विकारण्यात येणार आहे.

संबंधित माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून मार्च—२०२५ परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थी संख्येनुसार नोंदणी शुल्क निर्धारीत करण्यात आलेले आहे. दि. १० ऑगस्ट २०२५ नंतर प्रचलित पध्दतीनुसार दंडात्मक शुल्कासह नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण अंकाची वर्गणी ऑनलाईन पध्दतीने भरणा करावयाची आहे. तसेच सदर संकेतस्थळावरून तयार होणारी नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्काची रक्कम पेमेंट गेटवेद्वारे भरणा करण्याची सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. कोणत्याही परिस्थितीत विभागीय मंडळ स्तरावर नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्काची रक्कम रोखीने स्विकारण्यात येवू नये.

नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क नवीन संगणक प्रणालीद्वारे मंडळाकडे भरणा केल्याशिवाय फेब्रु./मार्च—२०२६ मध्ये घेण्यात येणा—या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने मंडळास सादर करता येणार नाहीत, याबाबत सर्व संबंधितांना अवगत करण्यात यावे.

उपरोक्त नव्याने सुरू करण्यात आलेल्या प्रणालीबाबत आपल्या अधिनस्त सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात यावे याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य मंडळास सादर करावा.

लेखा

(देविदास कुलाळ)
सचिव
राज्य मंडळ, पुणे ४.

प्रत माहितीस्तव—
व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे.